# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

(Govt. of Maharashtra Undertaking)


जाक्र.:मप्राशिप/समग्र शिक्षा अभियान/शा.व्य.स./२०१८-१९ / १५३८

दिनांक:- 23 MAY 2018

वाचा - १) शासन निर्णय आरटीई-१११४/प्रक्र११९/एस एम -१ दि.२०/०८/२०१४
२) या कार्यालयाचे पत्र क्र.१८१६ दि. २२/०७/२०१६
३) या कार्यालयाचे पत्र क्र.२२५६ दि. २५/०९/२०१७

---

## परिपत्रक

**विषय:-शैक्षणिक गुणवत्तेमध्ये शाळा व्यवस्थापन समिती, शाळा व्यवस्थापन विकास समिती आणि पालक सहभागाबाबत.**

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, RTE २००९ अंतर्गत कलम २१ नुसार शाळेच्या क्षेत्र /हद्दीमध्ये शाळा व्यवस्थापन समिती गठीत करण्यात येईल. तसेच सदर समिती दर दोन वर्षांनी पुनर्गठीत करण्यात येईल असे नमूद केलेले आहे. त्यानुसार राज्यात अंमलबजावणी सुरु आहे. शाळा व्यवस्थापन समिती व शाळा व्यवस्थापन विकास समितीच्या जबाबदाऱ्या व कार्ये यामध्ये शालेय विकासासाठी आवश्यक भौतिक बाबी उपलब्ध करून देणे, आर्थिक बाबीचे नियंत्रण याबद्दल अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यानुसार राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणात लोकसहभागातून शाळांच्या भौतिक सुविधांमध्ये वाढ झालेली आहे. शिवाय शाळा व्यवस्थापन समिती व पालक यांचा शालेय गुणवत्तेसाठी मिळत असलेल्या सहभागाचा परिणाम दिसून येत आहे. गुणवत्तेसाठी लोकचळवळ सुरु होऊन १०० टक्के मुलांच्या शिक्षणाचे उद्दिष्ट लवकरच पूर्ण होण्यास मदत मिळू शकेल असा आशेचा किरण दिसण्यास सुरुवात झाली आहे. यादृष्टीने यावर्षीचे नियोजन करण्यात येत आहे. संदर्भ क्र.३ अन्वये सन २०१७-१८ मध्ये शाळा व्यवस्थापन समिती सक्षमीकरण अंतर्गत खालील बाबी करण्यात आल्या आहेत.

अ) शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या, लोकसहभाग मिळविलेल्या व प्रगतशील शाळांना भेटी घडवून आणल्या आहेत. १००% मुले शिकत असणाऱ्या प्रगत शाळा, शाळा सिद्धी अंतर्गत ‘A’ ग्रेड शाळा, डिजिटल शाळा तसेच ज्या शाळांसाठी समाजाने मोठ्या स्वरुपात निधी, भौतिक, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या शाळांची प्रगत होण्यासाठीची वाटचाल, यावर उल्लेखनीय शाळा दाखवून सदस्यांची चर्चा घडवून आणली आहे.

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया


Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com